सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड – ४०२ ११०

जा क्र. सुसंकें/आस्था/जाहिरात/१३८/२०२२ दिनांक :२०/०४/२०२२

# जाहिर प्रसिद्धी (NOTICE)

प्रति,

..........................

..........................

**विषय** :– कंत्राटी पद्धतीने कृषि सहाय्यक नियुक्ती करणेबाबत...

**महोदय,**

उपरोक्त विषयांस अनुसरून सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन येथे कृषि सहाय्यक (कंत्राटी) या पदाची तात्पुरती नेमणूक करणेकरीता सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. कृषि सहाय्यक या पदासाठी अर्हता धारक उमेदवारांची निवड करावयाची आहे. सदर ठेका पद्धतीने काम करू इच्छिनाऱ्या उमदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव आणि अपेक्षित वेतन इत्यादी बाबी नमुद करून त्यांचे अर्ज/दरपत्रक **मा. प्रभारी अधिकारी, सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन, जि. रायगड** यांच्या नावे दि. ०५/०५/२०२२, ०५:३० वाजेपर्यंत सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन, जि. रायगड या कार्यालयाकडे विहित कालावधीत पोहचतील असे सादर करावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | अर्हता |
|---|---|---|---|
| १ | कृषि सहाय्यक | ०१ | १) बी.एस्.सी. कृषि/उद्यानविद्या पदवी अथवा कृषि पदविका अभ्यासक्रम विद्यापीठ मान्यता प्राप्त संस्थेमधुन पूर्ण केलेला असावा.<br>२) प्रक्षेत्रावरील कामाचा किमान ०२ वर्ष अनुभव असावा.<br>३) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठामध्ये काम केल्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |

**वरील तात्पुरती नेमणूक खालील अटी व शर्तींना अधिन राहून करावयाची आहे.**

१. सदर नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ठेका पद्धतीचा अवलंब करून आवश्यकतेप्रमाणे करण्यात येईल.
२. इच्छूक उमेद्वाराने आपला प्रती महिन्याचा दर दरपत्रकात नमुद करावा.
३. दरपत्रकासोबत सर्व आवश्यक कागदपत्राच्या छायांकीत प्रती तसेच रहिवासाचा पुरावा छायांकीत प्रतींसह जोडणे आवश्यक आहे.
४. नियुक्त केलेल्या उमेदवाराच्या कामाचे मुल्यमापन प्रभारी अधिकारी, सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन यांचेमार्फत करण्यात येईल. सदर उमेदवाराचे काम असमाधानकारक आढळल्यास करण्यात आलेली नियुक्ती दिलेल्या कालावधीच्या पुर्वी समाप्त करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.

५. उमेदवाराला ठेका संपण्यापूर्वी सदर ठेका रद्द करावयाचा असल्यास त्याने तशी अगाऊ सुचना एक महिना अगोदर लेखी स्वरूपात या कार्यालयाला देणे आवश्यक आहे. अशी अगाऊ सुचना न दिल्यास संबंधिताकडून एक महिन्याचा मेहनताना वसूल करण्यात येईल आणि अश्या व्यक्तीचा ठेका भविष्यात विचारात घेतला जाणार नाही.

६. वयाची मर्यादा — अर्जदाराचे वय ३८ वयापेक्षा जास्त नसावे. (अनु. जाती/अनु. जमातीच्या अर्जदारांना नियमानुसार वयोमर्यादेमध्ये सवलत दिली जाईल.)

७. कामाचे स्वरूप पाहून सदर ठेका सुरू ठेवायचा किंवा कोणतेही कारण न दाखवता केंव्हाही समाप्त करायचा अधिकार निम्नस्वाक्षरीकारांकडे राहिल.

८. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या ठेका कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

९. कृषि सहाय्यक म्हणून काम करण्यासाठी लघुत्तम प्राप्त दराचा ठेका स्विकारण्यात येणार असून, प्रत्यक्ष या कार्यालयात/प्रक्षेत्रावर काम करतांना झालेल्या इजा दुखापती किंवा अपघात यास हे कार्यालय कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्विकारणार नाही.

१० कोणतेही प्राप्त दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे तसेच कोणतेही कारण न देता सदरील प्रक्रिया रद्द करण्याबाबतचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखुन ठेवले आहेत.

११ पोस्टाने किंवा अन्य कोणत्याही कारणात्सव दरपत्रक/अर्ज या कार्यालयास विहित वेळेत प्राप्त न झाल्यास/विलंब झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१२ दरपत्रक सादर करतांना लिफाफ्यावर कृषि सहाय्यक कंत्राटी पदासाठीचे दरपत्रक असे नमुद करावे.

१३ कामाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रू. १००/— च्या बॉन्ड पेपरवर नेमणूक झालेल्या उमेदवाराने देणे बंधनकारक आहे.

आपला विश्वासू,

प्रभारी आधिकारी,
सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड.